# प्रकरण पहिले : मराठी कादंबरीचे स्वरूप विशेष

## ।। मराठी कादंबरीचे स्वरूप विशेष ।।

आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या ' **महानदीच्या तीरावर** ' आणि ' **झेलझपाट** ' या दोन कादंब-यांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेमधून करावयाचा असल्याने मराठी कादंबरीचे स्वरूप व तिचे विशेष ध्यानात घेणे आवश्यक ठरते. म्हणून प्रारंभी मराठी कादंबरी, तिची वैशिष्टये, तिचा विकास याचा विचार करावा लागेल. मराठीतील कथा, कविता, नाटक या वाङ्मयप्रकारांपेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार अनेक दृष्टीने वेगळा ठरणारा आहे. हा एक दीर्घ, विस्तृत आवाका असलेला वाङ्मयप्रकार असल्याने जीवनाचे व्यापक दर्शन कादंबरीमधून घडविणे शक्य असते.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतर अनेक वाङ्मय प्रकारांपेक्षा वेगळा ठरत असल्याने कादंबरीचे स्वरूप ध्यानात घेऊ. कादंबरीच्या व्याख्या स्थूलमानाने लक्षात घेतल्याने तिचे स्वरूप स्पष्ट होईल. ' नॉव्हेल ' या इंग्रजी संज्ञेपासून मराठीमध्ये कादंबरी हा शब्द आलेला आढळतो. तो संस्कृतमधील बाणभट्टाच्या ' कादंबरी ' या संस्कृत कथात्मक ग्रंथनामावरून मराठीत रूढ झाला.[1] असे असले तरी मराठी कादंबरीची परंपरा इंग्रजी कादंबरीशी न जोडता मराठीमध्ये पूर्वापार चालत आलेल्या लोकसाहित्यातील लोककथांशी तिचे नाते जोडणे योग्य होईल. लोककथा या आकाराने छोटया असल्या तरी ' शुकबाहत्तरी ', ' सिंहासन बत्तीशी ' यासारख्या ग्रंथांमधून साखळी पध्दतीने कथा सांगितलेल्या दिसतात. त्यामुळे स्थूलमानाने कादंबरी म्हणून अशा ग्रंथाकडे आपण पाहू शकतो. या संदर्भात राजवाडे यांचे मत मुद्दाम लक्षात घेण्याजोगे आहे. त्यांचे मते ' कादंबरीमय सारस्वत १) लहान गोष्टी 2) अद्भुत कथा 3) वस्तुस्थित्यादर्शक कथानके या तीन घटकांनी बनले आहे.'[2] तथापि कादंबरीची परंपरा इंग्रजी वाङ्मयाशी जोडून सांगितलेली दिसते.[3]

कादंबरी हे कथात्मक गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. तिला किमान लांबी तर हवीच त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची कमाल मर्यादा आणि किमान मर्यादा सूचित करण्यासाठी शब्दसंख्येचा आधार घेण्यात आला आहे. या वाङ्मयप्रकारात कथानकाला किंवा निवेदनाला महत्व असते. कादंबरीमध्ये व्यापलेल्या विषयांची वर्गवारी निश्चित करता येत नाही. ' जीवनाचें कलात्मक व विस्तृत गद्य-चित्र ' म्हणजे कादंबरी.[4] हे मा.का. देशपांडे यांचे विवेचन ध्यानात घेता कादंबरीमध्ये जीवनातील घटना व प्रसंगाच्या व्यापकपणावर त्यांनी भर दिलेला आढळतो.तर ना.सी.फडके यांनी कादंबरीचा विचार करताना तांत्रिक अंगावर अधिक

भर दिलेला दिसतो. ' गुंतागुंत, निरगाठ आणि उकल अशी तीन स्थाने कादंबरीत असावयास पाहिजेत. '[5] अशा प्रकारची आग्रही भूमिका त्यांनी घेतलेली दिसते. शिवाय कादंबरी लेखनामध्ये हे तंत्र त्यांनी परिश्रमपूर्वक सांभाळलेले आढळते. वि.का. राजवाडे यांनी ' चित्रकर्माप्रमाणे कादंबरी लेखन ही कला आहे आणि चित्रात हुबेहूब वस्तु दिसली असा भ्रम पाडावयाचा असतो, तीच त-हा कादंबरीचीही असते. संसारातील किंवा समाजातील जी हरत-हेची कृत्ये त्यापैकी अनेकांचा लोप करून कांही तेवढी प्रामुख्याने, ती मुळात असतील त्यापेक्षा जास्त ढळढळीत अशी दाखवायची हेच कादंबरी रचनेचे मुख्य रहस्य आहे. '[6] राजवाडेंचे हे विवेचन ध्यानात घेता असे म्हणता येईल की जीवनातील वास्तव कल्पनेच्या माध्यमातून चित्रीत करणे हे कादंबरीचे वैशिष्टय असते. नरहर कुरूंदकरांचे मते ' वाङ्मयकृतीतून व्यक्त होणारा अनुभव जीवनाच्या आकलनातून - अवलोकनातून निर्माण होतो. जीवनाचे हे आकलन व अवलोकन अनुभवाच्या पातळीवर अभिव्यक्त करण्याचे काम ललित वाङ्मय करीत असते. '[7] तसेच कादंबरी हे ललित वाङ्मय आहे म्हणूनच कुरुंदकर म्हणतात - ' कथा, कादंबरी, नाटक आणि कविता या जर स्थूलमानाने ललित वाङ्मयाच्या प्रमुख शाखा मानल्या तर त्यात वडिलकीचा मान कथा-कादंबरीचा असतो. '[8] कुरूंदकरांचे हे विवेचन ध्यानात घेता जीवनानुभवातून कादंबरी वाङमयाची निर्मिती होते म्हणून कादंबरी हे ललित वाङमय होय. बापट व गोडबोले यांनी कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे यथार्थ स्वरुप सांगताना कादंबरीची व्याख्या - ' सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून, काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तदवलम्बित जीवित-घटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून, व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मय विभाग,'[9] अशी केली. बापट व गोडबोले यांची व्याख्या ध्यानात घेता ते वास्तवातील घटना कल्पकतेच्या आधारे कथास्वरूपात सांगतात त्या घटनांवर कल्पकतेच्या साहाय्याने प्रकाश टाकतात असे स्पष्ट दिसते. तर उषा हस्तक यांनी ' लघुकथा आणि लघुकादंबरी ह्यांच्यापेक्षा तिला मानवी जीवनव्यवहारांचे दर्शन अधिक व्यापक स्वरूपात घडविता येते, कारण तिचा फलक त्यांच्याहून अधिक विस्तृत असतो. घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादी घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडीत असणा-या वास्तवाच्या विविधस्तरीय, व्यामिश्र रूपांचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी सामान्यतः स्थलकालाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.'[10] असे विवेचन केले आहे. त्यांचे हे कादंबरीविषयक विवेचन ध्यानात घेता, व्यक्ती, प्रसंग इत्यादि घटकांच्या साहाय्याने कादंबरीमधून जीवनाचे विस्तृत दर्शन शब्दांकित करता येते. याप्रमाणेच भालचंद्र नेमाडे यांनीही कादंबरी म्हणजे काय याविषयी मांडलेले मत विचारात घेणे अगत्याचे ठरते. ' कादंबरी

म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग - अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्य कृती असते.' [11] नेमाडे यांनी कादंबरीच्या व्याख्येमधून इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कादंबरी हा वाङ्मयप्रकार कोणत्या वैशिष्ट्यामुळे वेगळा ठरतो हे सांगितले आहे. तसेच कादंबरीची आशयसूत्रे जीवनानुभव आणि व्यक्तीदर्शन यामधील वैशिष्ट्यपूर्णताही त्यांनी स्पष्ट केली आहे. नेमाडे यांचे विवेचनावरून त्यांनी वास्तव जीवनातील घटना, प्रसंग, पात्रे यांच्या पूर्णत्वावर भर दिलेला दिसतो.

वरील सर्व व्याख्यांचे विवेचन केल्यानंतर कादंबरी वाङ्मयाची वैशिष्टये सांगता येतील. कादंबरी हे कथात्म गद्याचे विस्तृत स्वरूप आहे. कादंबरीत जीवनाचे चित्रण, सत्याभास वास्तवपूर्ण ठरेल अशारीतीने केलेले असते. ह्या वाङ्मय प्रकारात कथनाला व निवेदनाला महत्व असते. कादंबरीचा आशयच तिच्या विस्ताराची मर्यादा निश्चित करतो. मानवी जीवनाच्या अंतर्बाह्य परिसराच्या पार्श्वभूमीवर शोधबोध घेण्याचा प्रयत्न कादंबरीत केला जातो. जीवनातील सत्यदर्शन कादंबरीत घडते. घटना, व्यक्ती व वातावरण इत्यादी घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडीत असणा-या वास्तवाच्या विविधस्तरीय व व्यामिश्र स्वरूपाचे दर्शन कादंबरीतून घडवता येते. मानवी अनुभवांचे चित्रणही कादंबरीत घडते. कारण कादंबरी हा एक जीवन विषयक आत्माविष्कार होय. थोडक्यात - कादंबरी हा आशय आणि रूप याबाबतीत अत्यंत बहुविधता असलेला वाङ्मयप्रकार असल्याने त्याचे व्यवच्छेदक लक्षण निश्चित करणे कठीण जाते. हा एक कथात्मक वाङ्मयाचा आविष्कार असल्याने या वाङ्मयप्रकाराची वैशिष्टये सांगताना लवचिक भूमिका घेणे योग्य ठरते. वास्तवता, सेंद्रिय एकता, कथानकादी घटकांची स्वतंत्र जाणीव अर्थपूर्ण आकृतीबंध इत्यादी निकष केवळ ध्यानात घेवून चालत नाहीत. तर लांबीची किमान मर्यादा विशाल भाषिक अवकाश आणि व्यामिश्र आशयसूत्रे या गोष्टी ध्यानात घेतल्यावरच कादंबरीचे स्वरूप स्पष्ट होईल.

**कथानक ...**

कादंबरी हा कथात्मक वाङ्मयप्रकार असल्याने कादंबरीतील कथानकाला अतिशय महत्व असते. जीवनातील वास्तव आणि कल्पनेतील वास्तव यांचे बेमालूम मिश्रण कादंबरीत केलेले असते. म्हणजे मानवी जीवनव्यवहाराचे दर्शन घडविणे हा कादंबरीच्या निर्मितीमागील प्रमुख हेतू असतो. कथानकामध्ये एका किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील प्रसंगांची, समाजातील अनेक प्रश्नांची गुंफण केलेली असते. एका प्रसंगातून दुस-या प्रसंगाचे विकसन करीत असतानाच वाचकांची उत्कंठा वाढविली

जाते व प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्नही कधी कधी केला जातो. पण अनेकवेळा या निर्मितीमागील प्रेरणा अद्भुतता, गूढता आणि रहस्यमयता याच असलेल्या दिसतात. दिवास्वप्नाच्या माध्यमातून इच्छा-आकांक्षांची पूर्ती करून, हलक्या फुलक्या करमणुकीसाठी कथानकाची मांडणी करण्याचा प्रयत्न मराठी कादंबरीत आलेला दिसतो.

कादंबरीमध्ये विशिष्ट कालक्रमाने घडलेल्या घटनांचे कथानक असते. कादंबरी अनेक विषयांवर लिहिली जाते. हे विषय म्हणजेच तिचे बीज असते. कादंबरी सत्य पण संभवनीय हवी. घटना व प्रसंग जितके संभवनीय तितकी कादंबरी स्वाभाविक. उदा. हरिभाऊंच्या कादंब-या. कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता, कार्यकारण-मिमांसा व कुतूहलनिर्मिती हे गुण आवश्यक आहेत. कथानकात प्रसंगांची उभारणी केलेली असावी. ' कथानक अधिक चित्तवेधक होण्यासाठी त्यात समरप्रसंग असावा, विरोधी पक्षाचे द्वंद्व असावे.' [12] असे ना.सी. फडके म्हणतात. कादंबरीतील नायक नायिका तरूण सौंदर्यसंपन्न दाखवून वाचकांची रंजनाची भूक फडके - खांडेकर युगातील कादंबरीने भागविलेली दिसते. ' फडक्यांची कादंबरी मूलतः रंजनाच्या प्रेरणेतून निर्माण झालेली आहे. आणि वास्तववादी कादंबरीचा नुसता मुखवटा तिने धारण केलेला आहे, हे जाणत्या वाचकांना देखील काही काळ उमगू शकले नाही.' [13] हे उषा हस्तक यांचे विधान ध्यानात घेण्याजोगे आहे. 1960 पूर्वीच्या मराठी कादंबरीमध्ये व्यक्त झालेल्या आशयाचे स्वरूप रंजनवादी असलेले दिसते. ही कादंबरी मध्यमवर्गीय जीवनाशीच निगडीत राहीलेली दिसते. प्रणयकथांबरोबरच कांही वेळा उदारमतवाद, बुध्दीवाद, सुधारणावाद, समाजवाद, गांधीवाद इत्यादी प्रणालींचा लेखकांच्या जीवनदृष्टीवर प्रभाव पडलेला दिसतो. कथानकाबद्दल संरचनेबद्दल बंदिस्त संकल्पनाच स्वीकारलेली दिसते.

कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी पेचप्रसंगही असावा लागतो. उदा. श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबरीतील संघर्ष व्यक्ती व कुटुंब, अश्रू व सुख, ध्येयवाद आणि वास्तववाद यातील होता. कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यास शेवटही साजेसा व स्वाभाविक असावा लागतो. सर्व घटना गंभीर व शेवट गोड हे तंत्र चुकीचे असते. कालचक्र, अमृतवेल या आकर्षक कथानक असलेल्या कादंब-या होत.

सारांश - कादंबरीत कोणता तरी एखादा विषय असतो. मानवी जीवन व्यवहाराचे

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कोणते तरी रूप आविष्कृत करण्याचे सामर्थ्य कादंबरीत असते. प्रदीर्घ कालावधीत घडलेल्या घटनाद्वारे व्यक्ती आणि समाज यामधील संबंधांची उकल कादंबरीतील कथानकाद्वारे कादंबरीकार करीत असतो. त्याचबरोबर भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यातील कार्यकारणभाव उलघडून दाखविण्याचा प्रयत्न कादंबरीच्या कथानकातून केलेला असतो.

कादंबरीतील अनुभवविश्व अनेकविध अनुभवांनी व्यापलेले असते. अनुभवाची मांडणी करीत असताना कलावंत अनेक घटना-प्रसंगाद्वारे तपशील पुरवत असतो. या तपशीलातून एक कथा आपणासमोर साकार होत असते.

**स्वभावचित्रण** ...

मनुष्य तेवढे स्वभाव. त्यामुळेच मनुष्याच्या सर्व जिज्ञासेचा आणि आवडीचा विषय म्हणजे मनुष्य. मनुष्य स्वभावातील निरनिराळे गुणधर्म तो स्वतःच्या स्वभावाशी तुलना करून पाहात असतो. बाह्य वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंतःकरणात ज्या असंख्य घडोमोडी चालू असतात त्याचे दर्शन आल्हाददायक वाटते. कादंबरीचा दर्जा ठरविण्यास स्वभावरेखान ही कसोटी वापरतात. चांगल्या स्वभावरेखानाबद्दल ना.सी.फडके म्हणतात ' ज्यावेळी लेखकाच्या वर्णनाने वर्ण्य व्यक्ती वाचकांच्या पुढे मूर्तिमंत उभी राहते त्यावेळी व्यक्तिदर्शन सुंदर साधले आहे.' [14] फडके यांचे विवेचन ध्यानांत घेता व्यक्ती जशीच्या तशी शब्दांकित करणे चांगल्या स्वभाव दर्शनाचे लक्षण होय. मा. का. देशपांडे म्हणतात - स्वभावचित्रे ' प्रत्यक्ष ' व ' अप्रत्यक्ष ' या दोन पध्दतीने रेखाटता येतात. " पहिल्या पध्दतीत लेखक हा बाह्य रीतीनें स्वभावाचें रेखाटन करतो - म्हणजे आपल्या पात्रांच्या मनांत जे विचार - भावनांचे कल्लोळ उसळलेले असतात त्यांचें तो आविष्करण करतांना त्यावर टीका करतो व त्याबद्दलचें आपलें मतहि सांगून टाकतो. या पध्दतींत विश्लेषणाचा मुख्य भाग असल्यामुळें तिला ' विश्लेषण ' पध्दति असें नांवहि देतां येईल. दुस-या पध्दतींत कलावंत हा आपल्या पात्रांपासून अलग व दूर असा राहतो व त्यांच्या कृति व वाचा यांच्याद्वारें त्यांच्या स्वभाव विशेषांची कल्पना आणून देतो. ती देतांना मधून मधून कथेंतील इतर पात्रांना त्यांच्याबद्दल काय वाटतें तें सांगून चित्रणाचा ठळकपणा वाढवितो. " [15] देशपांडे यांच्या या विवेचनावरून लेखक पात्रांचे चित्रण बाह्य पध्दतीने करतात. बाह्य वर्णन करता करता सारे मनोगत सांगतात. दुस-या पध्दतीत तटस्थाची भूमिका घेऊन पात्रांना कृती व संवादात गुंतवून त्याद्वारे दर्शन घडवितांना दिसतात. ना. सी. फडके या दोन्ही पध्दतींचा अवलंब करतात. ही पात्रे, हे स्वभाव लेखकाच्या आजुबाजूस

असतात. बापट व गोडबोल म्हणतात - ' कलेच्या दृष्टीने कादंबरीतील स्वभावरेखाटन हे विशिष्ट गुणधर्मांचे प्रतीक नसून सत्यही आपल्या सभोवती वावरत असलेल्या मनुष्यांच्या स्वभावाचा परिचय करून देणारे असावे. ' [16] बापट व गोडबोल यांचे विवेचनावरून आपल्या सभोवती असणा-या माणसांच्या स्वभावाची ओळख, स्वभाव रेखाटनातून होते. वरील सर्व मतांवरून स्वभाव दर्शन हे स्वाभाविकपणे घडते. सभोवतालच्या व्यक्तींच्या सूक्ष्मनिरीक्षणातून स्वभावचित्रण केल्यास पात्रांचा विकास सहजगत्या व स्वाभाविकपणे होतो.

कादंबरीसृष्टी ही प्रत्यक्ष सृष्टीतील, वास्तवातील विविध अनुभवांच्या पायावर आधारलेली असते. पात्रांच्या भावनांशी तादात्म्य पावून ती निर्माण केली तर जिवंतपणा येतो व पात्रे प्रचारकी होत नाहीत. कादंबरीच्या विकासाबरोबर पात्रे अंतर्मुख झाली त्यांची आंदोलने, अस्वस्थता कादंब-यामधून प्रकट होऊ लागलेली दिसतात. स्थिर प्रवृत्तीची किंवा विकासी असेही पात्रांचे दोन वर्ग करता येतात. उदा. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंब-यातील ' राजेमास्तर ' हे स्थिर पात्र आहे तर वि.स.खांडेकर यांच्या ' अमृतवेल ' या कादंबरीतील ' देवदत्त ' हे विकासी पात्र आहे. एकोणिसाव्या शतकात काल्पनिक पात्रे निर्माण करतांना मनोव्यापारांची दखल घेतली जाऊ लागलेली दिसते. उदा. मर्ढेकरांची ' रात्रीचा दिवस ' .

सारांश - स्वभावचित्रण करताना स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण करावे लागते. पात्रावर नियंत्रण अथवा मते लादण्याची प्रवृत्ती नसेल तर पात्राचा विकास स्वाभाविकरित्या होतो. पात्रांची व्यक्तिवैशिष्टये लक्षात घेवून मग त्यात रंग भरावे लागतात. त्यामुळे त्यात तर्कशुध्दता व स्वाभाविकता हे गुण येतात. लेखकाची कल्पनाशक्ती तीव्र असावी लागते. व्यक्तीच्या भावनेशी, मनाशी, तादात्म्य पावण्याचा, समरस होण्याचा गुण चांगले स्वभावरेखन होण्यास आवश्यक असतो.

**वातावरणनिर्मिती** ...

कादंबरीमध्ये वातावरणाला महत्वाचे स्थान असते. वेगवेगळया घटना, प्रसंगाचे हुबेहूब चित्रण वातावरणाच्या चित्रणामुळे शक्य असते. प्रसंगांची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम कादंबरीतील वातावरणामुळे शक्य होते. विविध भावभावनांचे चित्रण प्रभावी आणि परिणामकारक करण्याचे काम वातावरणनिर्मितीमुळे शक्य होते. त्यामुळे वातावरणनिर्मिती हा कादंबरीतील महत्वाचा घटक ठरतो. ना. सी. फडके म्हणतात - ' त्या त्या प्रसंगांच्या वेळची निसर्गाची ठेवण आणि जवळच्या सजीव - निर्जीव पदार्थांची मांडणी या दोहोंचे मिळून वातावरण बनत असते.' [17] फडके म्हणतात त्याप्रमाणे

कादंबरीला वातावरणनिर्मितीची गरज असते. निसर्गाचे चित्रण, व्यक्तीचे चित्रण यांचे माध्यमातून कलावंत वातावरणाची निर्मिती करीत असतो. बापट आणि गोडबोले वातावरण, पार्श्वभूमी दोन प्रकारची मानतात. सामाजिक स्थलकालादिकांच्या वर्णनाने उभी राहणारी पार्श्वभूमी प्राकृतिक. समाज लोक त्यांच्या चालीरीती यांच्या वर्णनाने निर्माण होणारी पार्श्वभूमी सामाजिक होय. यादृष्टीने बापट व गोडबोले म्हणतात - ' स्थलकालवैशिष्ट्याचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजेच हे वातावरण होय. '[18] बापट-गोडबोले यांचे विवेचनावरून कादंबरीत त्या ठिकाणाचे त्या काळाचे वर्णन आलेले असते. त्या वर्णनाचा मानवी जीवनावर प्रभाव पडतो. कादंबरीतील वातावरणासंबंधी उषा हस्तक यांचे मत लक्षात घेण्याजोगे आहे. " कादंबरी रचनेत ' व्यक्ती ' ह्या घटकाप्रमाणेच ' वातावरण ' हा घटकही महत्वाचा आहे. किंबहुना, वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय विशेष मानण्यात येतो. कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाहीत, त्यांची मुळे ( कादंबरी बाहेरच्या जगात नव्हे, तर ) कादंबरीमध्ये, कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात रुजलेली असतात. कादंबरीचा फलक विस्तृत असल्यामुळे व्यक्तींच्या सभोवातलचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक तो सगळा बारीकसारीक तपशील कादंबरीकार पुरवू शकतो. कादंबरीतील व्यक्तींच्या आंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य ' वातावरणा ' मध्ये असते. कादंबरीकार त्याच्या ह्या सामर्थ्याचा ज्यावेळी उपयोग करून घेतो, त्यावेळी कादंबरीतील वातावरणाचे स्वरूप हे केवळ वर्णनात्मक पातळीवर राहत नाही, तर कादंबरीच्या रचनेचाच एक अविभाज्य दुवा बनते."[19] उषा हस्तक यांच्या या विवेचनावरून कादंबरीमध्ये व्यक्तिचित्रण हा घटक महत्वाचा असतो. त्याप्रमाणेच वातावरणनिर्मितीला महत्व आहे. वातावरण-निर्मितीमुळे कादंबरीतील पात्रांचे, मनाचे, शरीराचे, वर्णन करता येते. कादंबरीकाराने कादंबरीमध्ये वातावरणनिर्मिती केल्यास कादंबरीचा एक घटक म्हणून पार्श्वभूमी येते.

कादंबरीतील कथानक वर्तमानकाळाचे चित्रण करणारे असेल तर त्यातून तत्कालीन सामाजिक वास्तव प्रकट होत असते. कथानक भूतकाळी असेल तर ते ऐतिहासिक, तात्विक या प्रकारचे असते असे वातावरण वा.म.जोशी, खांडेकर इत्यादींच्या लेखनात आढळते.

सारांश - इतर घटकांच्या मानाने वातावरण निर्मितीला स्थान गौण असले तरी कादंबरीत पार्श्वभूमीचे महत्व आहेच. वातावरण-निर्मिती करताना मुद्दाम निसर्ग, ग्रामीण परिसर, नागर परिसर

अशा घटना प्रसंगाचे चित्रण केवळ उपरेपणाने येता कामा नये. कादंबरीतील आशयाशी त्याचे अतूट नाते असले पाहिजे. अशा प्रकारचे चित्रण वातावरण-निर्मितीस पोषक ठरते.

**भाषा व निवेदनपध्दती** ...

कादंबरीत निवेदनाला अतिशय महत्त्व असते. हे निवेदन प्रमाण भाषेत असते. इतर पात्रांच्या भाषेपेक्षा निवेदनाची भाषा वेगळी असल्याने त्याची वैशिष्ट्यपूर्णता लक्षात येते. निवेदक हा सर्व कथानकांचा साक्षीदार असतो. कथानकाच्या मांडणीत राहून गेलेले दुवे सांधण्याचा प्रयत्न निवेदक निवेदनाद्वारे करीत असतो. पात्रांबद्दल मत प्रकट करीत असतो. कादंबरीतील घटनाविषयी मत प्रतिपादन करतो. अनेकवेळा हा निवेदक म्हणजे अप्रत्यक्षपणे लेखकच तेथे असतो. निवेदनामधून लेखकाची मूल्यसापेक्ष दृष्टी स्पष्ट होते. पात्रे, घटना, प्रसंग समजून घेण्यास निवेदन उपयोगी असते. पात्रांच्या वर्तनाविषयी किंवा घडणा-या घटनाविषयी निवेदक शेरेबाजी करतो. कधी टीका टिप्पणीही करतो. त्यामुळे विनोद निर्मिती होत असते. ना. सी. फडके यांनी निवेदनाच्या साक्षात पध्दती, प्रतिबिंब पध्दती, अनुलोम पध्दती, विलोम पध्दती अशा चार पध्दती सांगितल्या आहेत.[20] त्याचे विवेचन सारांशरुपाने खालीलप्रमाणे सांगता येईल. साक्षात पध्दतीमध्ये लेखक प्रत्यक्ष जे पहातो व ऐकतो ते जसेच्या तसे शब्दांकित करतो. उदा. ' सूर्यास्त असा असा होतो.' प्रतिबिंब पध्दतीमध्ये लेखक एखादा प्रसंग, घटना इ. जसे दिसते तसे वर्णन करीत नाही. कादंबरीमधील एका पात्राला जसे दिसते तसे लिहितो, वर्णन करतो. उदा. ' सूर्यास्त कमलच्या डोळयाला असा असा दिसला.' तर अनुलोम पध्दतीमध्ये लेखक एखादा प्रसंग अथवा घटना कालानुक्रमाने तशाच वर्णन करतात. विलोम पध्दतीमध्ये लेखक एखाद्या प्रकरणाच्या शेवटी वाचकांना कादंबरीमधील कथेच्या एखाद्या घटना, प्रसंगापर्यंत आणतो व कथेमधील त्यापुढील एखादी घटना सांगतो. वाचकांची उत्कंठा, जिज्ञासा जागृत करतो. नंतर सोडलेल्या घटना, प्रसंगापासून नव्या घटनेपर्यंतच्या गोष्टी सांगतो व दोन्ही घटनांचा दुवा जुळवतो. या पध्दतीशिवाय कादंबरीकार निवेदनासाठी अनेक तंत्रांचा वापर करतो. उदा. कधी व्यक्तींना लिहिलेल्या पत्राद्वारे तर कधी एखाद्या व्यक्तीची रोजनिशी हेच कादंबरीचे निवेदन असते. म्हणूनच प्रमाणबध्द आणि अर्थपूर्ण तपशिलांच्या निवेदनाला कादंबरीच्या रचनेत महत्वाचे स्थान असते.

कादंबरीचे निवेदन करण्यास कादंबरीकार भाषेवरच अवलंबून असतो. कादंबरीतील भाषेसंबंधी उषा हस्तक म्हणतात - ' कादंबरीमध्ये ज्या अनेकविध व्यक्ती असतात, त्यांतील प्रत्येक व्यक्तीची भाषा वेगळी असते. तिच्या भाषेचे हे वेगळेपण कादंबरीकाराला — आपल्या भाषा-सामर्थ्याच्या

बळावर-प्रस्थापित करावे लागते. एखादा कादंबरीकार हा ज्यावेळी स्वतःच्याच भाषाशैलीच्या मोहात अडकतो, त्यावेळी त्याच्या विशिष्ट भाषाशैलीमुळे त्याच्या सगळया कादंब-या एकाच वाणाच्या, एकाच ढंगाच्या जाणवू लागतात. उदा. वि.स.खांडेकरांच्या कादंब-या '.[21] उषा हस्तक यांच्या विवेचनावरून कादंबरीची भाषा ही लेखकाची अनुभव व्यक्त करण्याची भाषा असते. व्यवहारातील भाषेपेक्षा तिचे रूप वेगळे जाणवत नाही. मात्र तिचा हेतू वेगळा असतो. भालचंद्र नेमाडे म्हणतात - ' साहित्यिक भाषेच्या रचनेला, विशिष्ट हेतूने एका संहितेत मांडलेले असते. ह्या संहितेसंबंधी काही पूर्वग्रह वाचकाने परंपरेने बाळगलेले असतात, लेखक व वाचक दोघांमध्ये हा रिवाज पाळला जातो. ह्या प्राथमिक संदर्भापलीकडे साहित्यिक भाषेच्या संहितेला एक आंतरिक रचनातत्व असते. ठरावीक अर्थप्राप्तीसाठी ठरावीक भाषिक रुपांची रचना मनात धरूनच लेखकाने भाषेची मांडणी केलेली असल्याने आपोआपच संहितेमध्ये हे रचनातत्व उपलब्ध होते. तेच परंपरेने साहित्यप्रकाराच्या ठरीव प्रतिसादांतून बाह्य पाठरचनेला आपण लागू करीत असतो.' [22] नेमाडे यांचे या विवेचनावरून कादंबरीतील शब्द, वाक्ये, परिच्छेद, वर्णने, घटना, प्रसंग, वैशिष्टये भाषिक रूपांनी प्रकट होतात. ही भाषिक रूपे कादंबरीच्या संहितेमधून परस्परांशी संबंध ठेवून वापरलेली असतात.

सारांश - कादंबरी हे निवेदन आहे. एखाद्या घटना, प्रसंगावेळी या या व्यक्ती होत्या व त्यांच्या बाबतीत असा असा प्रकार घडला हे लेखक कादंबरीत सांगतो. हे सांगताना तो अनेक पध्दतींचा वापर करतो. कथानिवेदन करताना लेखक चतुराईने या पध्दतींचा वापर करतो. 'आत्मनिवेदनपर ' अथवा ' प्रथमपुरूषी ' आणि ' त्रयस्थाची भूमिका ' घेऊन लेखक आवडीप्रमाणे व जरूरीप्रमाणे निवेदन करतो. कादंबरी कंटाळवाणी न होण्यास लेखक अशा विविध पध्दतींचा वापर करतो. वाचकांचे चित्तरंजन करतो. मनोगत व्यक्त करतो. निवेदनातील विविध पध्दतींपैकी एकाच पध्दतींचा वापर केल्यास कादंबरी कंटाळवाणी होण्याची शक्यता असते. म्हणून लेखकाने आलटून पालटून या पध्दतींचा वापर करावा असे म्हटल्यास वावगे होणार नाही. निवेदन करण्यास लेखक भाषेचा वापर करतो. पात्रांची भाषा वेगळी असते. हे वेगळेपण लेखक स्वतःच्या भाषासामर्थ्यावर स्पष्ट करतो.

**लेखकाची जीवनविषयक दृष्टी व काळाचा प्रभाव ...**

जगाकडे, मानवाकडे, जीवनातील अनुभवांकडे, मानवी जीवनव्यवहारांकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी निराळी असते. मानवी जीवनातील अनेकविध घटनांचे, स्थितींचे कादंबरीकार वर्णन

करतात. बाबा पद्मनजी यांनी ' यमुना पर्यटन ' ( 1857 ) या कादंबरीमध्ये विधवांच्या दु:स्थितीचे अनेक पैलू चित्रीत केले आहेत. पाश्चात्य संस्कृतीचा हिंदू संस्कृतीशी जो संयोग झाला त्यातून या कादंबरीचा उदय झाला होता. लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी ' मुक्तामाला ' ( 1861 ) या कादंबरीमध्ये तत्कालीन समाजाच्या अभिरुचीचे भान ठेवले व अद्भुतरसप्रधान कादंबरी लिहिली तर शिवकालाच्या पार्श्वभूमीवर त्या काळाचा प्रभाव लक्षात घेवून गुंजीकरांनी ' मोचनगड ' ( 1871 ) ही कादंबरी लिहिलेली दिसते.

मराठी वाड्मयाचा आधुनिक कालखंड हा 1855 नंतर सुरू होतो. ह.ना.आपटे यांच्या प्रारंभकाळी महाराष्ट्रात नवे विचारमंथन होऊ लागले होते. त्याचा हरिभाऊंच्या संवेदनाक्षम मनावर परिणाम झाला. तत्कालीन कालखंडात कौटुंबिक जीवनात शिरत चाललेले सुधारणेचे लोण, स्त्रियांची परवशता, अज्ञानामुळे सवती - मत्सर व सासुरवास यांचा होणारा असह्य जाच, निरनिराळे थोर नेते, त्यांची कार्य, त्यांच्या ध्येयासक्ती, समाजाची प्रतिक्रिया, व्रतवैकल्ये, नवससायास यावरील अंधविश्वास, अंधश्रध्दा अशा अनेक गोष्टींनी व्यापलेले समाजमन हरिभाऊंनी ' गणपतराव ', ' मधली स्थिती ', ' पण लक्षात कोण घेतो, ' ' मी ' इत्यादी कादंब-यांमधून चित्रीत केले आहे. रा.श्री.जोग म्हणतात, ' ह.ना. आपट्यांनी वाड्मयातील सत्यदर्शनाबद्दल विवेचन केले आहे.' [23] जोगांच्या विवेचनावरून आपटे, साहित्यातील वास्तवावर प्रकाश टाकताना दिसतात. बोधपरता हा त्यांच्या कादंबरीचा विशेष जाणवतो. 1885 ते 1920 या कालखंडातल्या अनेक लेखाकांवर, मराठी कादंब-यावर त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटला आहे.

वामन मल्हार जोशी यांनी कादंबरीमध्ये सामाजिक प्रश्नापेक्षा तात्विक चर्चेला महत्व दिले. ' आश्रम हरिणी ' ( 1915 ) या कादंबरीत त्यांनी दोन पुरूषांबरोबर एका स्त्रिला निष्ठेने वागता येईल का ? हा प्रश्न चर्चिला आहे. त्यावर प्रकाश टाकला आहे. ' रागिणी ' या कादंबरीमध्ये सामाजिक व बौध्दिक क्रांतीवर व त्यासंबंधीच्या मतमतांवर प्रकाश टाकला आहे. ' सुशिलेचा देव ' ( 1920 ) या कादंबरीत ध्येयाला देव मानणे योग्य की अयोग्य यावर चर्चा केली आहे. ' इंदु काळे व सरला भोळे ' या कादंबरीत तत्कालीन कला व नीती या प्रश्नावर चर्चा केली आहे. बापट व गोडबोले म्हणतात - ' वामनरावांच्या कादंब-यात सामाजिक प्रश्नापेक्षाही अधिक महत्व तात्विक चर्चेला आले व जरी हरिभाऊंच्या मानाने जोश्यांच्या कादंब-यांत समाजजीवनाचे तितके स्पष्ट चित्र न मिळाले तरी कादंबरीची तात्विक पातळी नि:संशय उंचावली.' [24] बापट व गोडबोले यांचे विवेचनावरून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

वामनरावांनी समाजातील अडीअडचणींवर प्रकाश टाकला आहे. त्यापेक्षा तात्विक भूमिकेवर अधिक भर दिलेला दिसतो.

केतकरांनी चिंतनशील वृत्तीने खोलात जाऊन समाजशास्त्रीय बैठकीला धरून लिखाण केले आहे. त्यांनी एकूण सात कादंब-या लिहिल्या. ' गोंडवनातील प्रियंवदा ' ( 1926 ) या कादंबरीमध्ये स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य, लैंगिक कोंडमारा चित्रीत केला आहे. केतकरांच्या कादंब-या विचारप्रधान आहेत. समाजाच्या विचारांना कादंब-यामधून चालना मिळते. केतकरांनी सभोवताली असलेल्या व्यक्तींची प्रतिकात्मक छाया कादंबरीत रेखाटली आहे. त्यांनी ' परागंदा ' ( 1926 ), ' आशावादी ' ( 1927 ), ' गांवसासू ' ( 1930), ' ब्राम्हणकन्या ' ( 1930 ), ' विचक्षणा ' ( 1936 ), ' भटक्या ' (अपूर्ण) या कादंब-या लिहिल्या. दुर्गा भागवत म्हणतात - ' डॉ. केतकरांची तीव्र निरीक्षणशक्ती, त्यांचे सामान्य घडामोडींचे व मानवी परस्पर संबंधाचे असामान्य ज्ञान, आपले व आपल्या भोवतीच्या व्यक्तींचे विचार जरासुध्दा आडपडदा न ठेवता जगापुढे मांडण्याचा त्यांचा प्रांजळपणा यामुळे त्यांचे व्यक्तीमत्व त्यांच्या सर्व गुणदोषांसकट, त्यांच्या लेखनात विशेषतः कादंब-यात, जसे दिसून येते तसे महाराष्ट्रातल्या दुस-या कादंबरीकाराच्या बाबतीत झालेले नाही. त्यांच्या कादंब-या म्हणजे त्यांच्या विचारांचा व कालिक भावभावनांचा सूक्ष्म नकाशाच आहे.[25] दुर्गा भागवत यांच्या विवेचनावरून केतकरांनी वास्तव जीवनातील आजुबाजूची पात्रे पाहिली व ती जशीच्या तशी नावे बदलून रेखाटली आहेत असे दिसते.

ना. सी. फडके यांनी बहुसंख्य मध्यमवर्गीय गटाचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व केले. ' अल्ला हो अकबर ' ( 1917 ) ही प्रौढ कादंबरी त्यांच्या आरंभीच्या कादंब-या मुक्तामालेशी साधर्म्य दाखविणा-या आहेत. फडके कलेसाठी कला हाच दृष्टिकोन ठेवतात. कादंबरीमधून सौंदर्याचे दर्शन घडवितात. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी स्त्रीशिक्षणाला आरंभ झालेला होता. सहवासोत्तर प्रेमाबरोबरच अनपेक्षित भेटी, सहवास, प्रेम, यांना महत्व आले. हे वर्णन फडक्यांनी कादंबरीमधून केलेले दिसते. प्रमाणबध्द, आटोपशीर व लाघवयुक्त कादंब-यांचे युग मराठीत त्यांनी सुरू केले. ' कुलाब्याची दांडी ' ( 1925 ), ' जादूगार ' ( 1928 ), ' दौलत ' ( 1929 ) इ. कादंब-यांमधून प्रणय रम्यतेला त्यांनी गंभीर विषयाची जोड दिली व कल्पनेला वाव दिला आहे. महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक घडामोडींचा उपयोग कादंबरीमध्ये वातावरणनिर्मितीसाठी करून घेतला. ' झंझावात ' ( 1948 ), ' उजाडलं ! पण सूर्य कुठे आहे ? ' ( 1950 ), तसेच ' एक होता युवराज ' ( 1964 ) ही त्यांची अलीकडची तर 'हेमूभूपाली' ही त्यांची शेवटची

कादंबरी होय. फडक्यांची कादंबरी रंजनात्मक आहे. बापट व गोडबोले म्हणतात - ' रसराज शृंगाराचा परिपोष कादंबरीवाङ्मयात प्रकर्षाने करण्याचा जो पायंडा प्रा. फडके यांनी पाडला त्याचे अनुकरण मराठी कादंबरीत पुढे अनेक लेखकांनी केले.'[26] बापट व गोडबोले यांचे विवेचनावरून फडके कादंबरीत रंजकतेबरोबर प्रणयरम्यता आणतात. रसांचा राजा शृंगार याला कादंबरीमध्ये विशेष स्थान दिलेले दिसते. या त्यांच्या वैशिष्टयाचा प्रभाव पुढे अनेक लेखकांवर पडलेला दिसतो.

रंजनात्मक कादंबरी ही निरनिराळे आभास निर्माण करीत असते. खांडेकरांच्या स्वप्नरंजनाचा प्रकार थोडा निराळा होता. ते मनाने समकालीन राजकारणाशी समरस झालेले होते. कलेसाठी कला की, जीवनासाठी कला या दोन तत्वातील ' जीवनासाठी कला ' या तत्वाचा पुरस्कार केला. ' हृदयाची हाक ' ( 1930 ) या कादंबरीवर फडक्यांच्या कलावादी दृष्टिकोनाची छाप दिसते. ' कांचनमृग ' ( 1931 ),' उल्का ' ( 1934 ),' हिरवा चाफा ' ( 1938 ),' दोन मने ' (1938), ' पांढरे ढग ' ( 1956 ), ' ययाति ' (1959), ' दोन ध्रुव ' ( 1961 ),' अमृतवेल ' ( 1967 ) इ. कादंब-या लिहिल्या. खांडेकरांची शैली अलंकारिक, कृत्रिम, कल्पनांचा वर्षाव करत सुभाषितवजा वाक्ये जागोजाग फेकणारी आहे. मधुनमधून त्यांची पात्रे पत्र लिहिण्याच्या निमित्ताने विस्तृत स्वगते सांगतात. खांडेकर हे त्याग, प्रेम, पराक्रम, आदर्श व मानवता यांचे पूजक होते. सामाजिक जीवनातील असाफल्याच्या जाणिवेची बूज खांडेकरांनी राखली. ' ययाति ' या प्रतिकात्मक कादंबरीच्या पोटात अनेक हळव्या स्वप्नरंजनांना त्यांनी जागा दिली आहे. खांडेकरांनी साहित्यात जीवनाभिमुखता आणली. कुसुमावती देशपांडे म्हणतात - ' मराठी कादंबरी केवळ एका सुखस्वप्नाच्या वृत्तीत गुंग होण्याचा संभव निर्माण झाला असताना त्यांनी तिचा वैचारिक जोम कायम राखण्याचा बुध्दिपुर:सर प्रयत्न केला[27]. देशपांडे यांच्या या विवेचनावरून विशिष्ट वृत्तीत रमलेल्या कादंबरीमध्ये त्यांनी विचारपूर्वक जागृती करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आपल्या वैशिष्टयपूर्ण गुणांमुळे वाचकांच्या मनात त्यांनी स्थान मिळविले होते.

याच कालखंडात ग.त्र्यं. माडखोलकरांनी ' मुक्तात्मा ' ( 1913 ), ' भंगलेले देवूळ ' (1930), ' शाम ' ( 1936 ), ' कांता ' ( 1939 ), ' मुखवटे ' ( 1940 ) इ. कादंब-यांचे लेखन केले. याच काळात मामा वरेरकरांनी ' विधवाकुमारी ', ' परतभेट, ' ' गोदू गोखले,' ' मी व राम जोशी ' इत्यादी कादंब-या लिहिल्या. साने गुरूजींनी ' श्यामची आई ' ही कादंबरी लिहिली.

साध्या विषयात त्यांनी मोठा आशय सांगितला. वि.दा.सावरकरांनी ' मला काय त्याचे ? ', 'काळेपाणी' या कादंब-या लिहिल्या, र.वा. दिघे, बोरकर, वि.वा. शिरवाडकर, शांता शेळके इत्यादी कादंबरीकारांनी मोलाची भर घातली.

सारांश - एकूण कालखंडाचा सारांश लक्षात घेता ह.ना. आपटे यांनी बोधपरता हा हेतू ठेवून कादंबरी लिहिली. समाज सुधारण्याचा प्रयत्न केला. त्या कालखंडातील कौटुंबिक व सामाजिक प्रश्नावर प्रकाश टाकला. वा. म. जोशी यांनी सामाजिक प्रश्नांपेक्षा तात्त्विक विचारांना अधिक प्राधान्य दिलेले दिसते. केतकर भोवतालच्या व्यक्ती प्रतिकात्मक रूपात चित्रीत करतात. ना.सी.फडके यांची कलावादी भूमिका दिसते. तत्कालीन समाजाचा विचार करून जीवनातील प्रणयरम्यतेला गंभीर विषयाची जोड देतात. कादंबरी रंजनपर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. खांडेकर ' जीवनासाठी कला ' या तत्वाचा पुरस्कार करतात. कादंब-यामध्ये चमत्कृती व सुभाषितवजा वाक्ये मधून मधून टाकून कादंबरी रंजनवादी करताना दिसतात. अशात-हेने वेगवेगळया कालखंडात वेगवेगळे दृष्टिकोन प्रभावी ठरलेले दिसतात. त्या त्या दृष्टीने त्या त्या कालखंडात त्यांनी प्रभावही गाजविलेला दिसतो. अशात-हेने सामाजिक दृष्टिकोन कादंब-यांमधून प्रकट झालेला दिसतो. ज्या कादंब-यांचा प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये विचार करणार आहोत त्यात नवकादंबरीची वैशिष्ट्ये आढळत नाहीत. म्हणून नवकादंबरीचा विचार करण्याचे टाळले आहे.

**प्रादेशिक कादंबरी** ...

कोणतीही कादंबरी ज्या युगात निर्माण होते त्या काळाचा प्रवास, ठसा याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष अपरिहार्य परिणाम कादंबरीवर होतो. 1950 नंतर प्रादेशिक कादंबरी लिहिली गेलेली दिसते. तत्पूर्वी ह. ना. आपटे यांच्या ' पिराजी पाटील ' या कादंबरीत पाटील याची कथा सांगितली आहे. परंतु प्रादेशिक जीवनावर स्वतंत्रपणाने, वेगळेपणाने लिहिता येते, याची जाणीव त्या कालखंडात नव्हती.

प्रादेशिक कादंबरीबाबत बापट व गोडबोले म्हणतात - ' लेखकाने आपल्या भिन्न भिन्न कादंब-यांसाठी एकच पार्श्वभूमी निवडली व या मर्यादितच का होईना भूभागाच्या सर्वांगिण जीवनाचा व त्या भागातील विशिष्ट चालीरीतींचा, लोकांच्या मनोवृत्तीचा परिचय करून दिला तर सहाजिकच अशा लेखकांच्या कृतीत एक प्रकारे एकात्मता तर निर्माण होतेच, पण त्या लेखकाच्या कृतीतील

पार्श्वभूमीचे वेगळेपण स्पष्ट जाणवते; व अशा कादंब-या प्रादेशिक कादंब-या या अभिधानाला पात्र होतात.[28] बापट व गोडबोले यांनी या विवेचनातून लेखक एखाद्या प्रदेशाचे अंगाने त्या प्रदेशातील जीवनाची, रूढी-परंपरांची, मनोवृत्तीची ओळख करून देतात. प्रादेशिक कादंबरीच्या या वैशिष्टयांवर प्रकाश टाकलेला दिसतो. आनंद यादव प्रादेशिक कादंबरीबाबत अधिक स्पष्टीकरणात्मक स्वरूपात लिहिताना दिसतात. ते म्हणतात - ' एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवन-संकेत, रीती, समूहजीवनातील भावभावना आणि या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवन - नाटय यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंब-या लिहिल्या जातात; त्यांना प्रादेशिक कादंब-या म्हणता येईल.[29] आनंद यादवांच्या या विवेचनावरून प्रादेशिक कादंबरीत एखाद्या भूप्रदेशाचे त्यातील जीवनाचे साकल्याने चित्रण केलेले असते. त्यातून त्या प्रदेशातील लोकांच्या अडचणींचे, तेथील जीवन-संघर्षाचे चित्रण केलेले असते.

वरील मतांवरून प्रादेशिक कादंबरीची वैशिष्टये सांगता येतील. प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट भूप्रदेश चित्रित केला जातो. त्या प्रदेशातील निसर्ग हाच त्या प्रदेशाचे वैशिष्टय असतो. त्यात त्या प्रदेशातील माणूस निसर्गनिष्ठ व्यवसाय करीत असतो. त्याचे निसर्गाशी रक्तसंबंध (जवळचे नाते) असतात. प्रदेशाशी तो पूर्णपणे एकरूप झालेला असतो. त्या मातीविषयी त्याला आस्था, प्रेम, ओढ असते. प्रदेशानुरूप त्याचे चालणे, बोलणे, वागणे असते. प्रदेशानुरूप असलेल्या रूढी, परंपरा, चालीरीतींना तो चिकटून असतो. त्याच्या मनोभावनाही प्रदेशानुरूप असतात. अशा भूप्रदेशाशी एकरूप झालेल्या मानवावर, प्रदेशावर सुधारीत मतांचे, विचारांचे आक्रमण होते. प्रादेशिकतेचे पातळीवरून जीवन-नाट्य फुलते. त्या जीवननाट्याचे चित्रण कादंबरीत येते. प्रादेशिक कादंबरीत प्रादेशिक शब्दांचा, शब्दप्रयोगांचा वापर केला जातो. तर कधी संपूर्ण प्रादेशिक बोली वापरली जाते. उदा. आनंद यादव यांची ' गोतावळा ' कादंबरी.

प्रादेशिक कादंबरीच्या रूपाने मराठी साहित्यात 1950 च्या दरम्यान नवचैतन्य आले हे नवचैतन्य प्रादेशिक कादंबरीला त्यातील वेगळेपणामुळे लाभले. 1940/45 च्या दरम्यान र.वा.दिघे यांनी ' पाणकळा ', ' सराई ' या कादंब-यांमधून केवळ फक्त निसर्गवर्णने केलेली दिसतात. 1945 च्या नंतर श्री. ना. पेंडसे यांनी ' हद्दपार ' व ' गारंबीचा बापू ' या कादंबरीत कोकणी जीवनाला सजीव व समूर्त केलेले दिसते. गो. नी. दाण्डेकरांनी ' माचीवरला बुधा ', ' पडघवली ' " पवना काठचा धोंडी ' या कादंब-या लिहिल्या. " पडघवली ' या कादंबरीत यंत्रयुग, बदलती सामाजिक

परिस्थिती व त्यामुळे उध्वस्त होणा-या कोकणातील एका खेडयाचे-पडघवलीचे-वर्णन केलेले दिसते. प्रादेशिक कादंबरीच्या दृष्टीने एक सफल कलाकृती म्हणजे व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी ' या कादंबरीत माण प्रदेशातील मानव जीवनाचे सखोल दर्शन घडविले आहे. याच काळात रणजित देसाई यांनी ' माझा गांव ', उध्दव शेळके यांनी ' धग ' या प्रादेशिक कादंब-या लिहिलेल्या दिसतात. 1970 च्या दरम्यान आनंद यादव यांनी ' गोतावळा ', रा.रं.बोराडे यांनी संपूर्ण प्रादेशिक बोलीतून लिहिलेल्या कादंब-या दिसतात. आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांच्या प्रेरणा प्रादेशिक कादंबरीत अप्रत्यक्षरित्या दिसतात.

थोडक्यात - प्रादेशिक कादंबारीकारांनी आपल्याच सभोवतालचा, जवळचा प्रदेश लिखाणासाठी निवडलेला दिसतो. त्या प्रदेशाचा तेथील निसर्गाशी एकरूप झालेल्या जनसमुहाचे, त्यांच्या तन, मन, धनाचे, त्यांच्या समस्यांचे चित्रण कादंबरीमधून साकल्याने केलेले दिसते. वैशिष्टयपूर्ण लिखाण केलेले दिसते.

**जातीजमातींचे चित्रण करणा-या कादंब-या ...**

मराठीमध्ये हरिभाऊ आपटे यांनी ' मधली स्थिती ',' गणपतराव ', ' पण लक्षात कोण घेतो ? ', ' यशवंतराव खरे ', ' मी ' यासारख्या कादंब-यातून समाजाला दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या कादंब-यातून कोणता तरी एक प्रश्न हाताळला. त्यानंतर श्री.व्यं.केतकरांनी ' गोंडवनातील प्रियंवदा ', ' परागंदा ',' आशावादी ',' गावसासू ',' ब्राम्हणकन्या ' यासारख्या कादंब-या सामाजिक दृष्टिकोन स्वीकारून लिहिल्या. त्याबरोबरच वा.म.जोशी यांच्या ' रागिणी ', ' सुशिलेचा देव ', ' इंदू काळे व सरला भोळे ' या कादंब-यातून स्त्री समस्यांचे चित्रण सामाजिक अंगाने केलेले दिसते.

अशारितीने सुरूवातीच्या काळात सामाजिकतेचे चित्रण जरी कादंब-यातून आलेले दिसत असले तरी विशिष्ट असा वर्ग या कादंब-यातून आला आहे. तळागाळातील अनेक जाती जमातींचे चित्रण अल्पप्रमाणातच आले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र मराठी कादंबरीला वेगळे वळण मिळाले. कादंबरीचे विषय बदलले. मराठी कादंबरी उच्च वर्गापासून ते झोपडपट्टीपर्यंत तळागाळातील जाती-जमातीपर्यंत पोचली. त्यामुळे या काळात कादंबरीचे अनुभव क्षेत्र खूपच विस्तारले गेलेले दिसते. आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांच्या प्रेरणा या प्रादेशिक कादंबरीमध्ये अप्रत्यक्षरित्या दिसतात.

विभावरी शिरूरकरांची ' बळी ', माडगूळकरांची ' बनगरवाडी ' ह्या प्रारंभीच्या काळातील जातीजमातींचे चित्रण करणा-या कादंब-या होत. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-या लिहिल्या गेलेल्या आढळतात. त्या याप्रमाणे शं.रा. भिसे ' जंगलातील छाया ' ( 1945 ), वा. ब. कर्णिक ' वाडगीन ' ( 1951 ), दुर्गा भागवत 'महानदीच्या तीरावर ' ( 1953 ), गो. नी. दांडेकर ' जैत रे जैत ' ( 1965 ), अनिल बर्वे ' डोंगर म्हातारा झाला ' ( 1977 ), साने गुरूजी ' शबरी ' (1984), मधुकर वाकोडे ' झेलझपाट ' ( 1988), शरद दळवी ' एकलव्य ' (1988), सुरेश द्वादशीवार ' हाकूमी ' ( 1989 ), जगदीश गोडबोले ' पारधा ' (1989), दीनानाथ मनोहर ' आंदोलन ' यापैकी ' **महानदीच्या तीरावर** ' आणि ' **झेलझपाट** ' ह्या दोन कादंब-यांचा वेगवेगळया अंगाने चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास करीत असताना एकूण मराठी कादंब-यातील आदिवासी जीवनाचे चित्रण कशाप्रकारे व्यक्त झालेले आहे याचा स्थूल आलेख निश्चित करता येईल.

**सारांश** ...प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रथम कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप पाहिले आहे. आशय व रूप याबाबतीत विविधता असल्याने कादंबरीचे निश्चित लक्षण अथवा व्याख्या करता येत नाही. कादंबरी कथात्मक वाङ्मयाचा आविष्कार होय. त्यामुळे कादंबरीची वैशिष्टये ठरविताना लवचिक भूमिका घ्यावी लागते. हे कादंबरीचा विशाल भाषिक अवकाश व आशयामधील विविधा लक्षात घेवून कादंबरीचे स्वरूप ठरविण्यास कादंबरीतील घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला आहे.

कादंबरीचे कथानकास कादंबरीमध्ये महत्वाचे स्थान असते. तिचे महत्व आपण अभ्यासले आहे.

कादंबरीतील कथेचा विषय हे तिचे बीज असते. म्हणूनच हे कथानक वाचकांची उत्कंठा वाढविणारे चित्तवेधक, त्यांची जिज्ञासा व कुतूहल जागृत करणारे असावे. वाचकांना कादंबरी वाचावी वाटावी असे कथानक असावे. म्हणूनच कथानक हा कादंबरीचा आत्मा होय हे आपण अभ्यासले.

कादंबरीमध्ये स्वभावचित्रणालाही महत्व असल्याने स्वभावचित्रण कशाप्रकारे केले जावे व कसे असावे याचा आपण अभ्यास केला. व्यक्तीच्या भावनेशी, मनाशी तादात्म्य पावणारे एकरूप

होण्याचा गुण, चांगले स्वभावचित्रण होण्यास उपयुक्त ठरतो. स्वभावचित्रणाच्या विविध पध्दतींचा, प्रकारांचा आपण अभ्यास केला आहे. पात्रांचा विकास स्वाभाविकरित्या होण्यासाठी लेखकाने आपली मते पात्रांवर न लादता पात्रांचे चित्रण करण्याची गरज आहे हे आपण पाहिले.

इतर घटकांप्रमाणेच वातावरणनिर्मितीलाही कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून वातावरणनिर्मिती कशा प्रकारची असावी याचा आपण अभ्यास केला. वातावरणातून तत्कालीन वास्तव प्रकट होते. कादंबरीतील आशयाशी तिचे अतूट नाते असते.

कादंबरी कंटाळवाणी होऊ नये यासाठी कादंबरीकाराने कथा निवेदन करताना चतुराईने विविध पध्दतींचा वापर करणे कसे गरजेचे आहे, या पध्दती कोणत्या, त्यांचा अभ्यास आपण केला. थोडक्यांत सांगावयाचे तर कथा निवेदनाच्या ज्या अनेक पध्दती आहेत त्यांचा आलटून पालटून वापर केलेला असतो. पात्रांची भाषा वेगळी असते हे वेगळेपण लेखकाने स्वतःच्या सामर्थ्यांवर स्पष्ट करावयाचे असते याचाही आपण अभ्यास केला आहे.

कादंबरीच्य कालखंडाचा आपण थोडक्यात अभ्यास केला आहे. लेखकाची जीवन विषयक दृष्टी कादंबरी लिहिताना कशा प्रकारची होती त्यावर तत्कालीन काळाचा प्रभाव पडला होता का ? याचाही आपण अभ्यास केला. त्यानुसार वेगवेगळया कालखंडात वेगवेगळे दृष्टिकोन प्रभावी ठरलेले दिसतात. त्या कालखंडात त्या त्या लेखकांनी प्रभावही गाजविलेला दिसतो. कादंब-यांमधून सामाजिक दृष्टिकोन प्रकट झाला आहे, त्याचाही अभ्यास केला आहे.

विशिष्ट भूप्रदेश निवडून त्या भूप्रदेशांचा, तेथील जीवनाचा सर्वांगाने विवेचन करणा-या प्रादेशिक कादंब-यांचा अभ्यास केला आहे. निसर्गाशी एकरूप झालेल्या जनसमुहाचे, त्यांच्या समस्यांचे चित्रण कादंबरीकारांनी केलेले आहे. ते कादंबरीकार व त्यांच्या कादंब-याचा उल्लेख केला आहे.

तळागाळातील जातीजमातींचे चित्रण करणा-या कादंब-याही लिहिल्या जाऊ लागल्या होत्या. आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांच्या प्रेरणा प्रादेशिक कादंबरीमध्ये अप्रत्यक्षरित्या दिसतात.

**************

**संदर्भ टीपा ...**


1. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोष** : 3 सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, ( प्रथम प्रकाशन ) 1976, पृ. 599.
2. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.) **राजवाडे लेखसंग्रह**, साहित्य अकादमी प्रकाशन,नदी दिल्ली, ( आवृत्ती दुसरी ) 1967, पृ. 266.
3. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), उ.नि. पृ. 599.
4. मा. का. देशपांडे, **साहित्य साधना**, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, (आवृत्ती प्रथम) 1961, पृ. 153.
5. ना. सी. फडके, **प्रतिभा साधन**, देशमुख आणि कंपनी, पुणे, ( आवृत्ती नववी ) 1965, पृ. 146.
6. लक्ष्मणशास्त्री जोशी ( संपा.) उ.नि-2,पृ. 287.
7. नरहर कुरूंदकर, **धार आणि काठ**, देशमुख आणि कंपनी, पुणे, ( आवृत्ती तिसरी ) 1993, पृ. 5.
8. तत्रैव, पृ.3.
9. प्र.वा. बापट, ना.वा. गोडबोले, **मराठी कादंबरी ( तंत्र आणि विकास )**, व्हीनस प्रकाशन, पुणे, ( आवृत्ती तिसरी ) 1973, पृ. 37.
10. उषा हस्तक, कादंबरी - **साहित्यःअध्यापन आणि प्रकार**, श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर इ. (संपा.), पॉप्युलर व मौज प्रकाशन, मुंबई, ( आवृत्ती प्रथम ) 1987, पृ. 253.
11. भालचंद्र नेमाडे, **टीकास्वयंवर** , साकेत प्रकाशन, औरंगाबाद, ( आवृत्ती पहिली ) 1990, पृ. 198.
12. ना.सी. फडके, उ.नि. पृ.89.
13. उषा हस्तक, उ.नि. पृ. 257.
14. ना.सी. फडके, उ.नि. पृ.107.

15. मा.का.देशपांडे, उ.नि. पृ. 178.

16. प्र.वा. बापट, ना.वा. गोडबोले, उ.नि. पृ. 113.

17. ना.सी. फडके, उ.नि. पृ. 142.

18. प्र.वा.बापट, ना.वा. गोडबोले, उ.नि. पृ. 129 -130.

19. उषा हस्तक, उ.नि. पृ. 274.

20. ना.सी.फडके, उ.नि. पृ. 130, 31, 34.

21. उषा हस्तक, उ.नि. पृ. 277.

22. भालचंद्र नेमाडे, **साहित्याची भाषा**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, (आवृत्ती पहिली) 1987, पृ.15.

23. रा.श्री. जोग, **मराठी वाङमयाचा इतिहास भाग दोन**, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, ( आवृत्ती प्रथम ) 1973, पृ. 321.

24. प्र. वा. बापट, ना.वा. गोडबोले, उ.नि. पृ. 270.

25. दुर्गा भागवत, **केतकरी कादंबरी**, मौज प्रकाशन, मुंबई ( आवृत्ती पहिली) 1967, पृ. 15.

26. प्र. वा. बापट व ना.वा. गोडबोले, उ.नि. पृ. 235.

27. कुसुमावती देशपांडे, **मराठी कादंबरी पहिले शतक 1850 - 1950**, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई ( आवृत्ती दुसरी ) 1975, पृ. 250.

28. प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले, उ.नि. पृ. 245.

29. आनंद यादव, **ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ( आवृत्ती दुसरी ) 1984, पृ. 76.

xxxxxxxxxxxxx

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI